# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ६९८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/१०/२०१७

**१) विषारी औषध प्राशन करून औषधोपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु . :–**

दिनांक ०१/१०/२०१७ चे ०९.१५ वाजता दरम्यान यातील मृतक सौ. प्रमीला तुळसीराम घरडे वय ५५ वर्ष रा. शेडी/ सोमनाडा हीने घरी कोणीही घरी हजर नसतांना थिमेट नावाचे विषारी औषध घेतल्याने प्रकृती खराब झाल्याने तिला औषधोपचारा करीता सरकारी दवाखाना पवनी येथे नेले असता पुढील उपचारा करीता सा. रू. भंडारा येथे उपचार करून पुढील उपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता, उपचारा दरम्यान दि. ०६/१०/२०१७ चे १४.०० वाजता मरण पावल्याने पो.स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जा.फौ चे कागद पत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. चुटे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.ना.राहांगडाले पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**२) नदीचे पात्रात मुलीचे प्रेत तरंगतांनी मिळुन आल्याने मर्ग नोंद . :–**

दिनांक ०७/१०/२०१७ चे १५३० ते ८/१०/२०१७ चे ०८.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची शेती हि चुलबंद नदिचे पलीकडे असुन दिनांक ०७/१०/२०१७ चे ०८.२० वाजता. फिर्यादी हा आपले पत्नीसह शेतावर गेला असता फिर्यादीची मृतक मुलगी कु. पुजा मुरारी बांडे वय ०८ वर्ष रा.बोथली ही ११. ०० वा. शेतावर आली ती १५.३० वाजता घरी जाते म्हणुन शेतावरून घरी एकटीच निघुन आली १६.०० वाजता दरम्यान फिर्यादी हा घरी आला तेव्हा त्याची मुलगी घरी आली नसल्याचे कळल्यावर फिर्यादीने तिचा गावात व शेतात व नदीचे पात्रात शोध घेतला ति मिळुन आली नाही, व चुलबंद नदीचे पात्रातील पाण्यात मृतकचे प्रेत तंरगतांनी दिसुन आल्याने फिर्यादी मुरारी आसाराम बांडे वय ३५ वर्ष रा. बोथली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाने पो.स्टे दिघोरी हे करीत आहेत.

**३) विहीरीचे पाण्यात बुडुन वृध्द महिलेचा मृत्यु . :–**

दिनांक ०८/१०/२०१७ चे ६.०० वाजता दरम्यान यातील मृतक लताबाई कारूजी जुनघरे वय ८० वर्ष रा. सिव्हीलवार्ड साकोली ही वयोवृध्द असुन पायाचे हाड मोडल्याचे जुने त्रासाला कंटाळुन सार्वजनीक विहीरीत उडी घेवुन विहीरीचे पाण्यात बुडुन मरण पावल्याने, फिर्यादी राजु कारूजी जुनघरे वय ४० वर्ष रा. सिव्हील वार्ड साकोली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. लेंडे पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

**४) विज अंगावर पडुन इसमाचा मृत्यु:–**

दिनांक ०७/१०/२०१७ चे १६.०० ते १६.३० वाजता दरम्यान यातील मृतक धनराज डोमा गोबाडे वय ५२ वर्ष रा. जांभोरा हा शेतावर शेतीचे कामा करीता गेला असता अचानक विज अंगावर पडुन मरण पावल्याने फिर्यादी गुरूदेव युवराज गोबाडे वय २७ वर्ष रा. जांभोरा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नंदेश्वर पो.स्टे करडी हे करीत आहेत.

**५) अनोखळी महिलेचे प्रेत विहीरीचे पाण्यात तंरगतांनी दिसुन आल्याने मर्ग नोंद . :–**

दिनांक ०८/१०/२०१७ चे १७.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी विनायक पांडुरग हटवार वय ४९ वर्ष रा. सातोना हा आपले शेतावर पाणी टाकण्याकरीता गेला असता पाणी व धान पाहुन शेतावरील विहीरीवर हातपाय धुण्यास गेला असता विहीरीत डोकावुन पाहीले असता विहीरीत एक अनोळखी महिला जातीचे वय अंदाजे ४५ वर्ष वयोगटाती प्रेत पाण्यात तंरगतांनी दिसुन आल्याने, फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ.खोंडे पो.स्टे वरठी हे करीत आहेत.

**६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०८/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ११४ केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता